# वऱ्हाडसमाचार.

## छापखाना.

( नोटीस खातें )

आकोला——तारीख ६ माहे मे सन १९१८ ई०


## जाहीर नोटीस.

रा. गणू बरद अवधूत काळोने कुणबी राहणार घोडेगांव तालुका आकोट पोष्ट तेल्हारा यांसः——

खालीं सही करणार याजकडून या जाहीर नोटिसीनें कळविण्यांत येते कीं:——

वऱ्हाड समाचार छापखान्याचे तारीख ८ माहे एप्रील सन १९१८ च्या नोटीस खात्याची नोटीस नं. १३३ ची तारीख २६-३-१८ ची नोटीस तुह्मी दिली ती मजला आज १४ दिवस झाले मजला मिळाली. ती सर्व नोटीस बेमानाची नियत धरून व लबाड लोकांच्या सल्लेप्रमाणें दिली आहे.

सन १९१४ सालांत रक्तपितीच्या रोगानें तुह्मी अगदीं त्रस्त झाले तेव्हां तुमच्या मनास असें वाटलें कीं, माझ्या बायका आतां मजपाशी राहणार नाहीं या भीतीनें तुह्मी माझा व माझ्या संततीचे नांव मृत्युपत्राच्याआधारे आमची खातरी करून दिली ती अशी कीं, माझ्या व माझ्या स्त्रीच्या अंगावरील थोडेबहुत असलेले दागदागीनें हे खासन असल्यामुळें त्यावर तुमची पूर्ण मालकी आहे माझा कांहीएक हक्क नाहीं. व मौजे घोडेगांव ता. आकोट येथील सर्वेनंबर ७१ पैकीं पोटहिस्सा नंबर १ दहा ( १० ) एकर गुंठे ३४ आकार रुपये २६ चें शेत आह्मास आमच्या हयाती पर्यंतों वाहून उपभोग घेण्यास आणि उत्पन्नाचे स्वाधीन केले ही गोष्ट झाल्यामुळें व आमचे अन्नवस्त्राची काळजी आह्मास न राहिल्यामुळें आह्मी मृत्युपत्र झाल्या दिवसापासून एक वर्ष पावेतों तुमचें संगोपन फार उत्तम प्रकारें केले. पुढ तुमचे मुलींनीं व बहिणींनी व सामसरगीक लोकांनी आह्मी तुह्मास वागविणार नाहीं व संगोपन करणार नाहीं अशा उलटीच गोष्टी सांगून तुमचे मन आमचे विषयीं बिघडविलें. व गांवचेच चार पंच जमा करून त्यांचे समक्ष आमच्या अंगावरील आमचे मालकीचे थोडबहुत असलेले दागीने व आमच्या ताब्यात दिलेल्या शेताचे उत्पन्नाचे एक वर्षाचे रुपये शंभर १०० आमचे पासून हिसकावून घेऊन एकेक लुगड्यानें आह्मास घरांतून काढून दिले. या गोष्टीस आज मितीस तीन वर्षे होत आलीं असतां आह्मी तुह्मास शेताच उत्पन्नाचे तीन वर्षाचे ३०० तीनशे रुपये व शेत मागूं लागलो तर तुह्मी आह्मास ही खोटा नोटीस दिली ती आह्मास बिलकूल कबूल नाहीं. तर या नोटिशीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं, मौजे घोडेगांव येथील वर दिलेले शेतामधील माझा एक हतायांत शिवा पांच वर्षाकरितां आह्मी दरसाल रुपये प्रमाणें आह्मी लोकांचे कर्ज देण्याकरितां रुपये १५० माझे निम्मे हिश्याचे अगाऊ भोमजी वा। गणपत पाटील व बळीराम वा। घेंडी ठाकूर यांचेपासून घेऊन त्याचे ताब्यांत दिले आहे. तर त्यानां शेत वाहण्यास तुह्मी हरकत करूं नये. हरकत केल्यास ते तुमच्यावर फौजदारी करतील कारण त्या शेतचे कबजेदार आह्मी आहोत. आह्मी तुमचे येथें येण्यास तयार आहे व तुमचे संगोपन करण्यास तयार आहोत. तर नोटीस पावल्यापासून आमचे पंधरा दिवसांचे आंत चार पंच आमचे गांवीं आणून आह्मास न न्याल व माझ्या तर्फे असलेले शेताचे वहीतदार यांच्या वहीतीस हरकत कराल तर मी तालुका ऑफिसर ता. आकोट यांचेकडे अन्नवस्त्राची फौजदारीत फिर्याद करून वरील शेत ताब्यांत घेईन. हा नोटीस दिली सही. ता. २४-४-१८

सही

मुक्ताबाई मर्द गणु काळोने
रहणार घोडेगांव पोष्ट तेल्हारा
ता० आकोट जि. बांगडी

नो. नं. १४२.

---

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटिसीनें दामा वा। जयराम मळी पाटील कुणबी राहणार बाखराबाद ता. आकोला यांस आणि बायनी उर्फ रखवदा मर्द रतन राहणार सांगवी बाजार ता. आकोला यांसः——

कळविण्यात येते कीं, तुझे लग्न भंडारज ता. बाळापूर येथें गेले होते त्या सोयऱ्यानें मुलगी तुजला दिली नाहीं ह्मणून तू बायनीला भीड घलून माझी मुलगी मे ठुनकी ही तिचे बरोबर लग्नास गेली असतां तिचेशी माझी संमती नसतां अज्ञान मुलीचे लग्न माझे परवानगीशिवाय लावून घेतले असें मी ऐकतों माझी मुलगी ठुनकी इच वय ९ वर्षांचें असून तिजला मी विचारले असतां ती बरोबर सांगत नाहीं ह्मणून मी तुह्मा उभयतांस नोटीस देतो कीं; तुह्मी तिचा पालनकर्ता मी असून मजला फसवून लग्न लाविले या साठी मी तुह्मावर फौजदारी करणार आहे तर तुमचें काय ह्मणणें आहे त्याचा जबाब नोटीस पावल्यापासून १५ दिवसांत द्यावा ह्मणजे मजला पुढील मार्ग करण्यास ठीक पडेल. ही नोटीस दिली मुक्काम आकोला. ता १८-४-१८

सही

पर्वत सखाराम दस्तूर खद
मौजे बरड बिहाड्याचे ता०
आकोट पोष्ट तेल्हारा.

नो. नं. १४१

---

## नोटीस.

नोटीस बेशमी रामजी वा। खंडूजी लोहार राहणार सस्ती हल्लीं मुक्काम व्याळे ता. बाळापूर जि. आकोला यांसः——

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं, तुमची ता. २३-४-१८ ची तुमचे मुलाचे नांवची हस्तलिखीत नोटीस पावली. सन १९१५।१६ व १९१६।१७ सालचे शेत स्वामित्वाचे दोन्ही सालचे पैसे माझी तुळसाई मर्द शिवराम लोहार हीस दिले आहेत. आतां तुह्मी ही विनाकारण खोटी नोटीस दिली आहे. मला तुमचे कांहीं देणें नाहीं. व पुढें तुह्मी कांहीं भानगड उपस्थित केल्यास मी जबाबदार नाहीं. या नोटिशीचा खर्च तुमचेवर आहे कळावे. ता. २-५-१८ इ.

सही

गणपत परसराम रा. सस्ती
द. खुद.
सहीची निशाणी आंगठा
रामजी वा। नारायण उंबरकार
रा. सस्ती याचा खुद.
पोष्ट पातूर.

नो. नं. १४४

---


आकोला वऱ्हाडसमाचार छा. खा.